**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या चार संसदीय समित्यांची पुनर्रचना

- आपत्कालीन परिस्थितीत अलर्ट साठी सेल ब्रॉडकास्ट या संदेश प्रसारण सुविधेचा आज प्रारंभ

- पश्चिम बंगाल विधानसभेच्या दोन मतदारसंघात १५ मतदान केंद्रावर फेरमतदान सुरु/ ११ वाजेपर्यंत सरासरी ३७ टक्के मतदान

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर ८९ पूर्णांक ७९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

**आणि**

- थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपान्त्यफेरीत भारताचा सामना आज फ्रान्सबरोबर

**<><><><><>**

लोकसभा सभापती ओम बिरला यांनी २०२६-२७ या वर्षासाठी चार संसदीय समित्यांची पुनर्रचना केली आहे. लोकसभेतले भाजप खासदार डॉ. संजय जयस्वाल यांची लोकसभेच्या ३० सदस्यांच्या अंदाज समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभेतले १५ आणि राज्यसभेतल्या ७ सदस्यांचा समावेश असलेल्या सार्वजनिक उपक्रम समितीचं अध्यक्षपद भाजप खासदार बैजयंत पांडा यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे. बिर्ला यांनी लोकसभेतले काँग्रेस खासदार के.सी. वेणुगोपाल यांची लोकलेखा समितीच्या अध्यक्ष पदावर नियुक्ती केली आहे. यात लोकसभेतले १५, आणि राज्यसभेतल्या ७ सदस्यांचा समावेश आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कल्याण समितीचं अध्यक्षपद लोकसभेतले भाजप खासदार फग्गन सिंग कुलस्ते यांच्याकडे असेल. या समितीत लोकसभेतले २० आणि राज्यसभेतल्या १० सदस्यांचा समावेश असेल. या चार समित्यांचा कार्यकाळ १ मे २०२६ ते ३० एप्रिल २०२७ हा असेल.

<><><><><>

केंद्र सरकारनं आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांपर्यंत जलदगतीनं सुरक्षा आणि इशारा विषयक संदेश पोहचवण्यासाठीच्या सेल ब्रॉडकास्ट या संदेश प्रसारण सुविधेचा आज प्रारंभ केला. याअंतर्गत सराव चाचणीचा भाग म्हणून संपूर्ण देशभरात एकाचवेळी नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर इंग्रजी आणि स्थानिक भाषेतून आपत्कालीन ईशारा देणारे संदेश पाठवले गेले.

केंद्रीय दूरसंवाद विभागानं स्वदेशी तंत्रज्ञान वापरून ही सुविधा विकसीत केली असल्याची माहिती केंद्रीय दळणवळणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली. हे संदेश म्हणजे सराव चाचणी असून, नागरिकांनी घाबरून जाऊ नये असंही त्यांनी म्हटलं आहे. भविष्यात कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत या सुविधेचा वापर करून नागरिकांना योग्य वेळेत, त्या ठिकाणच्या स्थानिक भाषांमध्ये संदेश पाठवले जातील असं त्यांनी सांगितलं. नागरिकांच्या सुरक्षेला बळकटी देणं तसंच आपत्कालीन परिस्थितीत जलदगतीनं माहिती पोहचवण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं टाकलेलं हे महत्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमधे दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातल्या दोन मतदारसंघातल्या १५ मतदान केंद्रावर आज फेरमतदान सुरू आहे. सकाळी सात वाजता मतदान सुरू झालं. मगराहाट पश्चिम इथल्या अकरा आणि डायमंड हार्बर इथल्या चार मतदान केंद्रावर मतदानाच्या वेळी गैरप्रकार झाल्याचं दिसून आल्यावर या ठिकाणी फेरमतदान घेण्याच्या सूचना निवडणूक आयोगानं दिल्या होत्या. सर्व मतदान

केंद्रांवर शांततेत मतदान सुरू असल्याचं प्रशासनानं सांगितलं. सकाळी अकरा वाजेपर्यंत मगराहाट पश्चिम इथं ३८ टक्क्यापेक्षा जास्त, तर डायमंड हार्बर इथं ३६ टक्के मतदानाची नोंद झाली असून सरासरी ३७ टक्के मतदान झालं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या वेळी पर्यवेक्षक म्हणून केंद्रीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयात हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या निर्णयाला तृणमूल काँग्रेसने न्यायालयात आव्हान दिलं होतं, न्यायमूर्ती पी एस नरसिंहा आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचं काटेकोरपणे पालन व्हायला हवं असे निर्देश यावेळी न्यायालयाने दिले. कोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करायची हा सर्वथा निवडणूक आयोगाचा अधिकार आहे, असं न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यावेळी म्हणाले. मतमोजणीच्या वेळचे सीसीटीव्ही फूटेज उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी तृणमूल काँग्रेसचे वकील कपिल सिब्बल यांनी केली. यावर हे फूटेज ४५ दिवसांसाठी जतन केलं जाईल, असं आयोगाने न्यायालयाला सांगितलं.

पश्चिम बंगाल विधानसभेसाठी २३ आणि २९ एप्रिलला दोन टप्प्यात मतदान झालं. येत्या सोमवारी ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

टपाली मतांच्या पाकिटांची अवैधरित्या छाननी सुरू असल्याचा आरोप करत तृणमूल काँग्रेसनं कोलकाता इथल्या खुदीराम अनुशीलन केंद्रासमोर आज निदर्शनं केली. आज पहाटे चार वाजता टपाली मतदानाच्या आठ मतपेट्या सीटीटीव्ही नसलेल्या खोलीत आणल्या आणि त्याची अवैधरित्या छाननी केली जात असल्याचा आरोप तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी केला. उत्तर आणि पूर्व कोलकाता इथल्या अनेक मतदारसंघातल्या मतपेट्या खुदीराम अनुशीलन केंद्रात ठेवल्या

आहेत. तृणमूलच्या कार्यकर्त्यांची निदर्शनं सुरू असतानाच इथं भाजपाचे कार्यकर्ते दाखल झाले, दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी सुरू झाल्यामुळे वातावरणात तणाव निर्माण झाला होता.

<><><><><>

महाराष्ट्रात राज्य शिक्षण मंडळानं घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज ऑनलाईन जाहीर झाला. यंदा परीक्षा देणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ८९ पूर्णांक ७९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, अशी माहिती राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली. यंदाही उत्तीर्णांमधे विद्यार्थिनींचं प्रमाण जास्त आहे. कोकण विभागात उत्तीर्णांचं प्रमाण सर्वाधिक ९४ पूर्णांक १४ शतांश टक्के आहे. लातूर विभागीय मंडळात उत्तीर्णांचं प्रमाण सर्वात कमी ८४ पूर्णांक १४ शतांश टक्के इतकं आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या या संकेतस्थळांवर  निकाल उपलब्ध आहे. निकालानंतर विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सेवा मोफत उपलब्ध आहे.गुण पडताळणीसाठी उद्या तीन मे पासून येत्या १७ मे पर्यंत विद्यार्थ्यांना गुणपडताळणीसाठी अर्ज करता येतील. पुरवणी परीक्षेसाठी किंवा श्रेणी सुधार परीक्षेसाठीचं वेळापत्रक नंतर जाहीर होईल, असं मंडळाच्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबईतल्या MDSL, अर्थात माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड ने भारतीय नौदलाच्या ‘प्रकल्प १७ अ’ अंतर्गत, बनवलेली ‘निलगिरी’ या श्रेणीतली ‘'महेंद्रगिरी' ही सहावी युद्धनौका गेल्या ३० एप्रिल रोजी भारतीय नौदलाकडे सुपूर्द करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत बनवलेल्या नौका, बहुउद्देशीय आणि अष्टपैलू युद्धनौकांचा समूह असून, सागरी क्षेत्रातली सध्याची स्थिती आणि नव्यानं उद्भवणाऱ्या आव्हानांचा सामना करण्याच्या दृष्टीनं बांधण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या अत्याधुनिक नौका, स्वदेशी रचना, गुप्तता, लढाऊ

क्षमता, आणि टिकाव धरण्याची क्षमता या क्षेत्रातली मोठी झेप असल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><>**

अमेरिका, युरोपियन युनियनमधून आयात होणाऱ्या कार आणि ट्रक वरच्या आयात शुल्कात वाढ करून ते २५ टक्क्यावर नेणार असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. युरोपियन युनियन व्यापार कराराचं पालन करण्यात अपयशी ठरलं असून, युरोपियन वाहन उत्पादकांनी अमेरिकेत उत्पादन सुरु करावं, असं आवाहन ट्रम्प यांनी केलं आहे. मात्र युरोपियन युनियननं, नेमकं कोणत्या नियमांचं उल्लंघन केलं, हे त्यांनी स्पष्ट केलं नाही.

युरोपियन युनियन आणि अमेरिके दरम्यानच्या करारानुसार, अमेरिकेत आयात होणाऱ्या युरोपीयन  वस्तूंवर १५ टक्के कर निश्चित करण्यात आला होता. त्यानंतर एका वर्षाच्या आतच अमेरिकेनं ही भूमिका घेतली असून, यामुळे  दोन्ही बाजूंमध्ये व्यापार तणाव निर्माण होण्याचे संकेत मिळत आहेत.

**<><><><>**

ओमानच्या आखातात आणि सागरी मार्गांवर अमेरिकेनं केलेल्या नाकेबंदीमुळे इराणचा  जवळजवळ ४ अब्ज ८० कोटी डॉलर्सचा तेल महसूल बुडाला आहे. अमेरिकेतल्या एका वृत्त संस्थेनं पेंटागॉनचा हवाला देत हा दावा केला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, निर्बंध घातलेल्या इराणी जहाजांविरोधातल्या अमेरिकेच्या कारवाईमुळे इराणच्या ऊर्जा निर्यातीत घट झाल्याचं यात म्हटलं आहे.

दरम्यान, इराणवरचा  आर्थिक दबाव कायम राखण्यासाठी ही मोहीम राबवली जात असल्याचं अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे सहायक सचिव शॉन पार्नेल यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

जम्मू आणि काश्मीर खोऱ्या दरम्यानच्या वंदे भारत एक्स्प्रेस गाडीची नियमित सेवा आजपासून अधिकृतपणे सुरु झाली. रेल्वे अश्विनी वैष्णव यांनी ३० एप्रिल रोजी या गाडीला हिरवा झेंडा दाखवून या सेवेचं उदघाटन केलं होतं. वंदे भारत एक्स्प्रेस मुळे जम्मू आणि श्रीनगर दरम्यानचा संपर्क मजबूत होईल अशी आशा आहे.

<><><><><>

थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत आज भारताच्या संघाची गाठ फ्रान्सच्या संघाशी पडणार आहे. उपान्त्यपूर्व फेरीत भारताचे लक्ष्य सेन, आयुष शेट्टी तसंच चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रांकी रेड्डी या जोडीने चिनी तैपेई बरोबरचेआपापले सामने जिंकल्याने भारत उपान्त्य फेरीत दाखल झाला आहे. महिलांच्या संघाला मात्र चीनकडून उबर चषक स्पर्धेत पराभव पत्करावा लागल्यानं डेन्मार्कमधे सुरु असलेल्या थॉमस चषकात भाग घेता आला नाही.

<><><><><>

यंदाच्या मे महिन्यात, महाराष्ट्र आणि गुजरातच्या काही भागांसह हिमालयाच्या पायथ्याकडचा प्रदेश आणि पूर्व किनारपट्टी या भागांत सरासरीपेक्षा जास्त तीव्रतेची उष्णतेची लाट राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. यंदाच्या मे महिन्यात देशाच्या अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील, तसंच वायव्य भारतात अनेक ठिकाणी, मध्य भारताचा काही भाग आणि लगतचा प्रदेश आणि ईशान्य भारताच्या दक्षिणेकडच्या भागात किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहील, असं हवामान विभागानं काल प्रसिद्ध केलेल्या मासिक अंदाजात म्हटलं आहे.

//<><><><><>//